Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण शिक्षणातील उपागम

दंडपाल भिमराव तायडे
एम.फिल. २०१३-१५
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद

**प्रस्तावना**

२१ वे शतक हे औदयोगिक शतक म्हणून ओळखले जाते. औदयोगिरकण हे जागतिक व मानवी विकासाचा केंद्रबिंदू असून प्रत्येक देशाचे आर्थिक प्राबल्य यावर अवलंबून आहे औदयोगिकरणाचे फायदे जसे आहेत तसेच तोटेही आहेत यांचे प्रत्यंतर म्हणजे वाढते शहरीकरण राहणीमानात बदल हे बदल जसे राष्ट्राच्या मानवाच्या विकासाला कारणीभूत ठरले तसेच त्यांचे काही दुष्परिणाम ही प्रदुषणाच्या रूपाने प्रकर्षाने जाणवू लागले आहेत.

आजच्या जगातील अनेकविध समस्यापैकी प्राधान्याने व तातडीने लक्ष पुरविले पाहिजे अशी एक समस्या म्हणजे पर्यावरण संरक्षण होय. शासनापासून ते सामान्य नागरिकापर्यत अनेक जण संख्या पर्यावरणाच्या स्वास्थासाठी कार्यरत आहेत पर्यावरण शिक्षण म्हणजे काय आजच्या काळातील त्याचे महत्व व त्यांची गरज हे मुददे अभ्यासण्यापूर्वी प्रत्येकाला हे माहित असले पाहिजे. की पर्यावरणचे संतुलन राखणे व पर्यावरणासंबंधी जाणीवजागृती निर्माण करणे या बाबतीत शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्वाची असू शकते आणि असली पाहिजे पर्यावरण शिक्षण व दैनंदिन जीवन यांच्यातील परस्परासंबंध समजावून घेणेही तेवढेच महत्वाचे आहे. जैविक व अजैविक घटक आणि त्यांच्यातील परस्परसंबंध यांच्या अभ्यासाला पर्यावरणशास्त्र असे संबोधले जाते मानवाच्या सर्व कृतीचा पर्यावरणावर काही ना काही परिणाम होत असतो अनेक वर्षापासून या सर्व बाबी मानवाला ज्ञात होत्या व त्यांच्या अभ्यासही केला जात होता. परंतू पर्यावरणास तसेच पर्यावरण शिक्षण या संज्ञाचा जन्म झाला नव्हता.

पूरातन काळापासून आपल्या संस्कृतीत पर्यावरणाला अनन्यसाधारण महत्व दिलेले आहे.ऋषी-मुनीनी निसर्गाचे संवर्धन संरक्षण संतुलन यावर सातत्याने भर दिलेला आहे बरेच सध्याचे पर्यावरण प्रदुषित असून मानवसहित सर्व सजीवांना ते घातक आहे अशा परिस्थिती मुळेच पर्यावरणशिक्षण आज अधिकाधिक उपागम पाहणे गरजेचे आहे.

पर्यावरण शिक्षणाचे उपागम-

प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर पर्यावरण शिक्षणाचा समावेश अभ्यासक्रमात करण्यासाठी

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

वेगवेगळया उपागमांचा अवंलब करता येते.




**१. अभ्यासक्रमातील स्वातंत्र्य विषय-**

आजचे युग पर्यावरणाच्या समस्याचे युग आहे मनुष्य जीवनाशी संबंधित अनेक ज्वलंत समस्या पर्यावरणाशी निगडीत आहेत मनुष्यजातीच्या खऱ्या अर्थाने अभ्यास करावयाचा असेल तर मनुष्यचाच अभ्यास केला पाहिजे मनुष्य हा पर्यावरणाचा आपत्य असल्यामुळे त्यांचा अभ्यास करतांना सर्व प्रथम पर्यावरणाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे.

लोकसंख्या आणि औदयोगिरण यांचा वेग प्रचंड असल्यामुळे नजिकच्या भविष्यात पर्यावरणाचा प्रश्न आणखी गंभिर रूप धारण करणार आहे त्यासाठी पर्यावरण शिक्षणाला अत्यंत साधारण महत्व प्राप्त झाले आहे म्हणून हा विषय एक स्वंतत्र्य विषय म्हणून अभ्यासक्रमांत ठेवता येईल.

**२. अभ्यासक्रमातील विषयाचा एक भाग / समवाय**

अभ्यासक्रमातील अनेक विषय पर्यावरणाशी संबंधीत आहेत इतिहास, भूगोल, सामान्य विज्ञान, जीवविज्ञान, भाषा इत्यादी विषयांच्या अभ्यासक्रमात पर्यावरणाशी संबंधित आवश्कतेनुसार १-२ घटक समाविष्ट करावे. या उपागमाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे अभ्यासक्रमातील विषयाचा बोजा वाढत नाही शिकवण्याकरीता स्वतंत्र्य व्यवस्थेची गरज भासत नाही.

**३. अवातर वाचन**

प्राथमिक स्तरापासून विदयापीठ स्तरापर्यंत विदयार्थ्यांच्या स्तरानुसार क्षमतेनुसार आणि आवडीनिवडीनुसार तसेच

काठीण्यपातळीला अनुसरून पर्यावरणाच्या विविध घटकांवर आधारित पुस्तके तयार करून ती अंवातर वाचनणाच्या स्वरूपात ठेवावी.

या उपागमाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे विदयार्थी व शिक्षक यांच्यावर कोणत्याही प्रकारचे ओझे वाढत नाही अध्यापनासाठी अतिरिक्त वेळ देण्यासाठी गरज भासत नाही.

**४. अभ्यासक्रमातील इतर विषयाबरोबर समन्वय**

प्राथमिक स्तरापासून तर वियापीठ स्तरापर्य प्रत्येक इयत्तेतील विदयार्थ्याचे वय आवडी निवडी आणि क्षमतांना अनुसरून पर्यावरण शिक्षणाचा समन्वय इतर विषयाबरोबर साधता येईल.

उदा.गणितामध्ये पर्यावरण या बाबीवर आधारित उदाहरणे टाकता येतील तसेच भाषेमध्ये पर्यावरणाशी संबंधित पाठांचा समावेश करता येईल तर इतिहास या विषयात ऐतिहासिक घटनाच्या पर्यावरणावर काय प्रभाव झाला ते विशद करता येईल.

विधी विषय तर पर्यावरण शिक्षणाशी अत्यंत जवळच्या संबंध राखून आहे रसायनशास्त्रामध्ये वर्णित कोणत्या वायुमुळे प्रदूषण होते कोणती मुलतत्वे प्रदुषणास कारणीभूत ठरतात व रासायनिक क्रिया - प्रक्रियाचा परिणाम पर्यावरणावर कसा प्रकारे होतो या सर्व बाबीचा उहापोहा करता येईल. प्राणीशास्त्र व वनस्पतीशास्त्र हे विषय पर्यावरणशी सर्वाधिक जवळचे आहेत नागरिकशास्त्रामध्ये सुध्दा नागरिकांचे हक्क आणि कर्तव्य शिकविताना पर्यावरण संवर्धनामध्ये नागरिकांचा भुमिका असा विषयाश जोडता येईल.

चर्चा केलेल्या विषयांच्या विविध घटकांचे विश्लेषण करून संदर्भ बिंदू plug points सर्वप्रथम शोधावे लागतील आणि तेथे पर्यारण शिक्षणचा विषयाशी जोडावा लागेल.राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आाि प्रशिक्षण परिषदेने प्लॅग पॉईटस इन पॉप्युलेशन एज्युकेश असे पुस्तक प्रकाशित केले आहे त्याच धर्तीवर पर्यावरण शिक्षणाकरीता सुध्दा प्लग पॉइन्टस शोधता येतील.

अभ्यासक्रमातील इतर विषयाबरोबर पर्यावरण शिक्षणाचा समन्वय साधणे ही बाब निश्चितपणे सोपी नाही परंतू या उपागमाचा अवलंब केल्यास विदयार्थी आणि शिक्षक यांच्यावरील बोजा वाढणार नाही व या विषयाचे ज्ञानपन सम्यक स्वरूपात देता येईल या कारणास्तव उपागम जगभर मान्यता पावला आहे.

१८ डिसेबर २००३ रोजी भारताच्या सर्वाच्च न्यायालयाने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेस पर्यावरण शिक्षणाचा एक आदर्श अभ्यासक्रम तयार करण्याचा आदेश दिल्ली एन.सी.ई.आर.टी ने आदेशास अनुसरून अभ्यासक्रम तयार करून तो कोर्टास सादर केला २२ एप्रिल २००४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने या अभ्यासक्रमास मान्यता दिली, त्यानुसार हा विषय इयत्ता ८ वीपर्यत एकात्मिक पध्दतीने आणि व ९,१० व १२ वी या इयत्ताना स्वतंत्र आणि अनिवार्य

विषयाच्या स्वरूपात शिकवायचा आहे या निर्णयावर सन२००५ ते २००६ पासून अंमलबजावणी करण्यात आली.

**समारोप-**

आपल्या देशात इ.स.१९५० नंतर झालेल्या अभूतपूर्व लोकसंख्यावाढीमुळे व गरजाच्या विस्फोटामुळे नैसर्गिक साधन संपदेचे फार मोठ्या प्रमाणावर शोषण आरंभ झाले या शोषणाचा वेग दिवसेदिवस वाढत आहे.दुसरी समस्या म्हणजे जमीनीचे उत्खनन बाहेर पडणारे टाकाऊ पदार्थ समावून घेण्याची निसर्गाची क्षमता मर्यादित असते ही जाणीव व सुध्दा मनुष्य विसरला आहे या दुहेरी संकटामुळे परिसंस्थाचे संतुलन बिघडण्याचा धोका फार मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला आहे व प्रवाह बदलण्यासाठी पर्यावरण शिक्षण व त्यातील उपागम अत्यंत महत्वाची भूमिका बजावत आहेत.